दैनिक

अन्यायाचा प्रतिकार — महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी

• वर्ष १६ वे • अंक १८६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.१ ऑक्टोबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com


## औद्योगिक वसाहतींमध्ये ट्रक टर्मिनल्स उपलब्ध करून

# वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घ्या : उपमुख्यमंत्री



**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

नवी मुंबई आणि परिसरातील औद्योगिक वसाहतींमध्ये ट्रक टर्मिनल्स उपलब्ध करून द्यावेत. वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घ्या, असे निर्देश देतानाच महिलांवर होणारे गुन्हे रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यात याव्यात असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज नवी मुंबई येथे सांगितले.

बेलापूर येथील सिडको भवनच्या सभागृहात आज उपमुख्यमंत्र्यांनी एमआयडीसी आणि कायदा सुव्यवस्था विषयक समस्या ऐकून घेतल्या. त्यावेळी ते बोलत होते. उद्योग राज्यमंत्री तथा रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु. आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, शशिकांत शिंदे, कोकण विभागीय आयुक्त विलास पाटील, नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंग, एमआयडीसीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी पी. डी. मलीकनेर आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, जेथे पाऊस जास्त पडतो तेथे डांबरी रस्त्याऐवजी सिमेंट काँक्रीटचे करावेत. जेणेकरून खड्ड्यांची समस्या जाणवणार नाही. औद्योगिक वसाहतींमध्ये पार्किंग, रस्ते, वृक्ष लागवडीसाठी जागा अशा प्रकारची कामे विशिष्ट मुदतीत पूर्ण झाली पाहिजे, असे निर्देश देतानाच आश्वाशीत केलेली कामे झाली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

एमआयडीसी कडून औद्योगिक वसाहतींना आवश्यक त्या सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. औद्योगिक वसाहतींमध्ये असलेल्या अडचणींवर तातडीने मार्ग काढून औद्योगिक संस्थांशी समन्वयातून उपाययोजना कराव्यात, असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

कायदा व सुव्यवस्थेचा आढावा यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी घेतला. पोलीस आयुक्तांनी आठवड्यातून एक दिवस भेटीचा वेळ ठरवावा जेणे करून सामान्यांना त्यांच्या तक्रारी मांडता येतील यासाठी नियोजन करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या. पोलीस स्थानके, चौक्या, वाहने, पोलिसांची निवास व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे याबाबत उपमुख्यमंत्र्यांनी आढावा घेतला. यावेळी नागरिकांच्या समस्या त्यांनी ऐकून घेतल्या.

# आ.प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून गाढी नदीवरील देवद पुलाच्या कामाला लवकरच सुरुवात

## पुलाच्या बांधणीसाठी होणार ११ कोटी ६७ लाख रुपये खर्च

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणी व सातत्यपुर्ण प्रयत्नातून गाढी नदीवरील देवद – सुकापूर, नवीन पनवेल पुलाच्या कामाला व कार्यादेशाला मंजुरी मिळाली असून लवकरच या महत्वपूर्ण कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिलेल्या शब्दाप्रमाणे वचनपूर्ती केली आहे.



पनवेल शहर व आजूबाजूच्या परिसरातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने देवद ठिकाणी लोकवस्ती विकसित होत आहे. त्या अनुषंगाने वाढते नागरीकरण आणि वाहतूक यांचा विचार करता या गावात जाण्यासाठी गाढी नदीवरील असलेला पूल जीर्ण झाल्याने या ठिकाणी नवीन आणि रुंद पूल निर्माण करण्याची मागणी सर्वप्रथम आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासनाकडे करत सततचा पाठपुरावा केला. तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे मागणी करतानाच या पुलाची आवश्यकता त्यांच्या लक्षात आणून दिली होती. आणि त्यानुसार या पुलाच्या कामासंदर्भात पत्रव्यवहार व बैठका घेऊन सार्वजनिक बांधकाम विभाग, सिडको, एमएमआरडीए यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला आणि त्यानुसार देवद पुलाच्या कामाला मंजुरी व कार्यादेश मिळाला आहे. या कामासाठी ११ कोटी ६७ लाख ०६ हजार ४४ रुपये खर्च येणार असून आरसीसी प्रकारचे हे काम १८ महिन्यात पूर्ण करण्याचे निर्देश कार्यादेशानुसार ठेकेदाराला देण्यात आला आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिलेल्या शब्दाप्रमाणे वचनपूर्ती करण्यात आल्याने देवद व परिसरातील नागरिकांच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार व्यक्त केले जात आहे.

# आजपासून निवासी डॉक्टर बेमुदत संपावर!

**दै.रायगड नगरी । मुंबई**


वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमांची शैक्षणिक फी माफी, प्रोत्साहन भत्ता, पालिका महाविद्यालयाच्या निवासी डॉक्टरांचा टीडीएसचा मुद्दा व राज्यभरातील वैद्यकीय महाविद्यालयातील हॉस्टेलसंबंधित समस्यांवर लवकरच सकारात्मक निर्णय घेऊ, असे आश्वासन सेंट्रल मार्ड संघटनेच्या शिष्टमंडळाला देण्यात आले होते. मात्र, महिना उलटून्ही यावर निर्णय झाला नसल्याने रास्त मागण्यांविषयी सरकार उदासीन असल्याची भावना राज्यभरातील निवासी डॉक्टरांमध्ये पसरली आहे. त्यामुळे आश्वासित मागण्या पूर्ण न झाल्याने निवासी डॉक्टरांनी उद्या सकाळी आठ वाजल्यापासून बेमुदत संपाचा इशारा दिला आहे.

या मागण्यांविषयीचे स्मरणपत्र निवासी डॉक्टरांनी संबंधित विभागाला दिले आहे. या स्मरणपत्रातून मार्डने राज्य शासनाला याविषयी लवकरात लवकर निर्णय घेण्याची विनंती केली. तसेच, निवासी डॉक्टरांच्या भावना लक्षात घेऊन मार्डच्या राज्यस्तरीय बैठकीत याविषयी तत्काळ निर्णय न झाल्यास एक ऑक्टोबरपासून बेमुदत राज्यस्तरीय संप करण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय, मागण्या लेखी स्वरुपात मान्य केल्याशिवाय संप मागे घेतला जाणार नाही, असे निवासी डॉक्टरांनी म्हटले आहे.

दरम्यान, कोरोना काळातील निवासी डॉक्टरांची रुग्णसेवा आणि झालेले शैक्षणिक नुकसान लक्षात घेऊन वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी शैक्षणिक फी माफीचे आश्वासन दिले होते. पण, अजूनही फी माफीचा निर्णय झाला नाही. शेवटी निवासी डॉक्टरांनी १ ऑक्टोबरपर्यंत मागणी मान्य न झाल्यास संपावर जाणार असल्याचे स्पष्ट केल्याने रुग्णांचा जीव टांगणीला लागला आहे. उद्या ५ हजारहून अधिक निवासी डॉक्टर संपावर जाणार आहे.

## संक्षिप्त...

### आरेत बिबट्याची दहशत; महिलेवर हल्ला



**दै.रायगड नगरी । मुंबई**

आरेत आता बिबट्या कधी कोणावर हल्ला करेल याचा नेम नाही. गोरेगाव (पूर्व ) आरे मध्ये युनिट नंबर ३ च्या सरकारी निवासस्थान येथे राहत असलेल्या कुमार आयुष यादव या ४ वर्ष वयाच्या बालकावर बिबट्याने दोन दिवसांपूर्वी हल्ला केला होता. सदर घटना ताजी असतानाच आज आरे मध्यवर्ती कार्यालय विसावा येथे सुमारे आठच्या सुमारास बिबट्याने पाठीमागून येत एका महिलेवर जोरदार हल्ला केला.

महिला घरातून बाहेर काठी टेकत आली आणि येथील कठड्यावर बसली आणि मग लगेच चक्क मागून येत बिबट्याने तीच्यावर हल्ला केला. बिबट्या या महिलेवर हल्ला केला. यावेळी या शूर महिलेने आपला जीव वाचवण्यासाठी आपल्या हातातील काठीने बिबट्यावर प्रति हल्ला करत त्याचा हल्ला परतवून लावला. यानंतर आजू बाजूला राहणारे नागरिक येथे आले. तेव्हा या महिलेने बिबट्याने हल्ला कसा केला आणि आपण कशी सुटका केली, हे सांगितले. या भागात वनखात्याने रात्रीची गस्त वाढवावी, प्रखर दिवे लावावे आणि बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी पिंजरे लावावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते निलेश धुरी यांनी केली. दरम्यान, आरे वसाहतीत गेले अनेक महिने बिबट्या येत आहे. आता बिबट्याने आपला मोर्चा आरेत वळवला असून तो चक्क येथील नागरिकांवर हल्ला करू लागल्याने येथील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.वनखात्याने गांभीर्याने दखल घेऊन बिबट्याचा लवकर बंदोबस्त करण्यासाठी त्वरीत जेरबंद करून पिंजरे लावावे अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# कुंडी नदी परिसरात अडकलेल्या पर्यटकांना काढण्यात बाहेर



**दै.रायगड नगरी । संजय कदम**

**पनवेल** : तालुक्यातील वाजेपूर गाव परिसरातील सलमान खान यांच्या फार्म हाऊसजवळ असलेल्या कुंडी नदी वर्षा सहलीसाठी गेलेले काही पर्यटक अचानकपणे वाढलेल्या पाण्याच्या लोंढ्यामुळे अडकले होते त्यांना सुखरूप स्थानिक ग्रामस्थ व तालुका पोलिसांच्या मदतीने बाहेर काढण्यात आले आहे.


गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या मुसळधार पावसाचा आनंद लुटण्यासाठी काहीजण त्या भागात पर्यटनासाठी गेले होते परंतु अचानकपणे पाण्याचा लोंढा वाढल्याने ते अडकले गेले.

यावेळी सलमान खान यांच्या अर्पिता फार्म हाऊस येथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या ही बाब लक्षात आल्याने त्यांनी तातडीने नेरे पोलीस बीट येथे कार्यरत असणारे एएसआय गोडसे यांना हि बाब कळवली. त्यांनी तात्काळ गावातील सामाजिक कार्यकर्ते नरेश पाटील यांना सांगून काही तरुणांना त्या ठिकाणी रस्सीसह पाठवण्यास सांगितले. ते सर्वजण त्या ठिकाणी पोहोचताच रस्सीच्या आधाराने त्या तरुणांनी अडकलेल्या पर्यटकांना सुखरूप बाहेर काढले. आपला जीव वाचवल्याबद्दल त्यांनी पनवेल तालुका पोलीसांसह नरेश पाटील व मदतीसाठी धाव घेणाऱ्या तरुणांचे आभार मानले आहेत.

# तळोजा वाहतूक पोलिसांच्या हप्ते बाजीमुळे वाहतूक कोंडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा वाहतूक पोलीस हे नागरिकांना वेठीस धरुन शासनाला निधी जमा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात हप्ते बाजी करून वाहतूक कोंडी निर्माण करीत आहेत. त्यामुळे पर्यटकांमध्ये तळोजा वाहतूक पोलिसांविरुद्ध असंतोष निर्माण झाला आहे. याची चौकशी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त करणार काय? असा प्रश्न नागरिकांमधून विचारला जात आहे.



तळोजा वाहतूक पोलिसांच्या हद्दीत तळोजा एमआयडीसीपासून रोडपाली रस्त्यावर येणाऱ्या ओव्हरब्रीजमध्ये मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. त्याचे मुख्य कारण असे की, वाहतूक पोलीस हे वाहन चालकांकडून जबरदस्तीने एक–एक हजार रुपयाची पावती फाडून शासनाला खुश ठेवण्यासाठी आणि स्वतः चे खिसे भरण्यासाठी वाहतूक कोंडी निर्माण करीत आहेत. त्यामुळे या मार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडीला जबाबदार हे तळोजा वाहतूक पोलीस आहेत.

त्यामुळे त्यांच्यावर नवीमुंबईचे पोलीस आयुक्त काय कारवाई करतात? याकडे सान्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

# मोदी सरकारचा सर्वसामान्यांना मोठा धक्का; नैसर्गिक वायूच्या किमतीत भरभक्कम वाढ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सर्वसामान्यांच्या समस्या लवकरच वाढणार आहेत. मोदी सरकारनं नैसर्गिक वायूच्या किमतींमध्ये ६२ टक्क्यांनी वाढ केली आहे. नैसर्गिक वायूचा वापर खतं, वीज उत्पादन आणि सीएनजी वायू तयार करताना केला जातो. त्यामुळे सीएनजी, पीएनजी आणि खतांच्या किमतीत वाढ होण्याची दाट शक्यता आहे.

ओएनजीसीच्या सारख्या सरकारी कंपन्या उत्पादन घेत असलेल्या नैसर्गिक वायूची किंमत १ ऑक्टोबरपासून २.९० डॉलर प्रति १० लाख ब्रिटिश थर्मल युनिट इतकी असेल. याआधी ही किंमत १.७९ डॉलर इतकी होती. मात्र आता नवा दर लागू होणार असून पुढील ६ महिन्यांसाठी हाच दर कायम असेल. समुद्रातून काढण्यात येणाऱ्या वायूचा दर ६.१३ डॉलर प्रति १० लाख ब्रिटिश थर्मल युनिट इतका असेल. यासाठीचं नोटिफिकेशन सरकारकडून जारी करण्यात आलं आहे.

नैसर्गिक वायूच्या दरात मोठी वाढ झाल्यानं .../२

# केंद्र सरकार काही राज्यांना न मागता हजारो कोटींचे पॅकेज देते : अजित पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्राच्या विविध भागात मुसळधार पावसाने पूरपरिस्थिती निर्माण झाली आणि त्यात शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ मदत देण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असून जिल्हाधिकारी आणि प्रशासकीय यंत्रणेकडून नुकसानाबद्दलची निश्चित माहिती मिळाल्यानंतर शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे.

अतिवृष्टीसोबतच काही भागातील धरणांचे पाणी सोडल्यामुळे पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. नैसर्गिक संकट आल्यानंतर वेगवेगळ्या प्रकारच्या मागण्या शेतकरी वर्ग, लोकप्रतिनिधींकडून करण्यात येतात. राज्य सरकारकडे अनेकांच्या मागण्या प्राप्त झाल्या आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार आणि मी सर्व परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी पीकविम्याचे पैसे लवकरात लवकर मिळवून देण्यासाठी विमा कंपन्यांशी चर्चा सुरू आहे, असेही अजित पवार यांनी सांगितले.

राज्यसरकार संपूर्ण माहिती गोळा करत आहे. .../२

# दिघोडे-गव्हाणफाटा महामार्गावर अवजड वाहनांवर वाहतूक पोलिसांची कारवाईची मोहीम

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : उरण तालुक्यातील दिघोडे – गव्हाणफाटा महामार्गावर नियमितच्या वाहतुक कोंडीमुळे दैनंदिन प्रवासी अक्षरशः हैराण झाले आहेत. दिघोडे पासून ते गव्हाणफाट्यापर्यंत महामार्गाच्या लगत सुरू असलेले अनधिकृत कंटेनर गोदामांमधील अवजड कंटेनर ट्रेलर वाहतुकीमुळे सामान्य नागरिक कमालीचे त्रस्त आहेत.

नवीमुंबईचे पोलिस आयुक्त बिपीन कुमार सिंह यांनी २७ सप्टेंबर २०२१ पासून सकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत नवीमुंबई पोलिस आयुक्तालय परिसरात अवजड कंटेनर ट्रेलर वाहतुकीला बंदी घातली आहे. त्याचे पालन न करणाऱ्या अवजड वाहनांवर उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक गायकवाड यांच्या वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. दिघोडे – गव्हाणफाटा महामार्गावर दिघोडे, वेश्वि, जांभुळपाडा, वाढघोडी खिंड या रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहने उभी करून महामार्ग ठप्प कारीत असल्याने तासंतास या मार्गावर वाहतूक कोंडी होत आहे.



त्यामुळे आत्ता नवीमुंबई पोलिस आयुक्तांच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करीत वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या अवजड वाहनांवर जोरदार कारवाईची मोहीम उरण वाहतूक शाखेचे पोलिस उपनिरीक्षक संजय पवार, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक संजय जाधव, पोलिस नाईक रविंद्र पार्टे व पोलिस नाईक विशाल भिसे यांनी सुरू केल्याने आत्ता वाहतूक कोंडी सुरळीत होत असल्याने प्रवासी आणि सामान्य नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे.

# ट्रकच्या धडकेने एकाचा मृत्यू २ जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ट्रकच्या धडकेने पादचारी दोघांपैकी एकाचा मृत्यू झाला आहे तर दोघे जण जखमी झाले असून त्यांना नजिकच्या रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.

पनवेलजवळील आसुडगावकडून कळंबोली सर्कल येथे जाणाऱ्या पुणे–मुंबई एक्स्प्रेस हायवेच्या एक्झिट बायपास रोडवर किशन शेट्टी (२४) व त्याचा मित्र राजेंद्रकुमार वर्मा (२८) व सोनकुमार मोदी (२५) हे तिघे पायी जात असताना त्यांना एक ट्रकची धडक बसल्याने झालेल्या अपघातात राजेंद्रकुमार वर्मा हा गंभीररित्या जखमी होऊन मयत पावला आहे. तर सोनकुमार मोदी व किशन शेट्टी हे जखमी झाले आहेत. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पाऊस त्रेधा

विज्ञानाने प्रगती केल्यानंतरही निसर्गाच्या लहरीपणाचा कहर भोगावाच लागतो. अविरत कोसळणाऱ्या पावसाने मागील काही दिवसांपासून राज्याच्या वेगवेगळ्या भागांना ही प्रचीती दिली. संपत्तीच्या नुकसानापेक्षाही जीवीतहानीचे संकट मोठे असते. राज्यातील सध्याच्या पाऊसबळींची संख्या एकवीसवर पोहोचली असून, पुढील काही दिवस असाच जाच सोसावा लागणार असल्याचे संकेत आहेत. 'गुलाब' चक्रीवादळाने मराठवाड्याला चांगलेच खिंडीत गाठले. औरंगाबाद, नाशिकसह काही जिल्ह्यांमधील पावसाची उपस्थिती धडकी वाढविणारी आहे. पूरस्थितीमुळे हेलिकॉप्टरची मदत घेऊन अनेकांची सुटका करावी लागली, यातूनच भयावहतेची कल्पना येते. अनेक भागांतील नदी–नाल्यांना पूर आला असून, घरे कोसळल्याने रस्त्यावर आलेल्या कुटुंबांची संख्याही मोठी आहे. जीवहानीही झाली आहे. आभाळी आपत्तीचा हा बेमुर्वतपणा गरिबांना अधिक चटका लावून जातो. एकदा आलेला पूर शेतकऱ्यांना दहा वर्षे मागे नेतो. आधीच गरजवंत असणाऱ्यांना हा आघात सोसवेनासा होतो. 'तौक्ते'पाठोपाठ 'गुलाब'ने धक्का देत काळजी वाढवली. या चक्रीवादळाचा भर तूर्त ओसरला असला, तरी 'ऑरेंज अॅलर्ट'मुळे धडकी कायम आहे. विदर्भ, मराठवाड्यापाठोपाठ कोकणातही अतिमुसळधार पावसाचा अंदाज आहे. मुंबईची किनारपट्टी, अहमदनगर, रत्नागिरी आणि पुण्यालाही सजग राहावे लागेल. सरकारी सज्जतेची परीक्षा घेणारा हा क्षण आहे. पावसाने मराठवाड्यात चांगलेच बस्तान बसविले. एवढ्या पावसाचा विक्रम मराठवाड्याने प्रथमच अनुभवला. पावसाविषयीचे अंदाज बऱ्यापैकी खरे ठरू लागल्याच्या काळात आपण पोहोचलो आहोत. शेतकरीराजाची अवस्था अजूनही 'शेतातले पीक, उगवेल तर विक' अशीच आहे. सध्याच्या अतिवृष्टीमुळे राज्यात अंदाजे २२ लाख हेक्टर शेतीचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. नजीकच्या काळात हे आकडे वाढतील. एकट्या सप्टेंबरमध्ये ७१ जणांचा मृत्यू ओढवला. राज्यातील या वर्षी एकूण अतिवृष्टी बळींचा आकडा ४३६ झाला आहे. मृतांच्या नातेवाइकांना चार लाख रुपयांचे साह्य करणार असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिली आहे. पडझडीच्या आणि कोसळण्याच्या काळात सरकारी हात दिलासादायक ठरेल. अतिवृष्टीने संकट संपले नसतानाच गतिशील उपाययोजना हवी. ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या दृष्टीने पावले टाकायला हवीत. सारीच दुःखे सरकारी पंचनाम्यांनी सुटली असती, तर लोकांनी सरकारऐवजी फक्त पावसाला नावे ठेवली असती. अशा संकटक्षणी स्थानिक प्रशासनाने गावपातळीवरील नियोजन करायला हवे. ठिकठिकाणच्या पालकमंत्र्यांची भूमिका फार महत्त्वाची असते. हवाई पाहणीतून मदत पोहोचू शकत नाही. त्यासाठी गावपातळीवरील व्यथांची 'आँखो देखी'च साहायक ठरू शकते. स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांनीही कार्यालये सोडून घटनास्थळी जायला हवे. पुराने तडाखा दिलेल्या गावकऱ्यांपुढे नुसता आश्वासनांचा रतीब थांबवायला हवा. पाऊस पाहणी हा सरकारी उपचार न ठरविता कर्तव्याचा भाग केला, तर खचलेल्या मनांना खरा दिलासा मिळेल. 'तौक्ते' किंवा 'गुलाब'पेक्षा सरकारी प्रश्नावलीद्वारे जागीच मदत गारद करणारे वादळ दुःखतप्त लोकांना अधिक त्रासदायक ठरते, असा आजवरचा अनुभव आहे. तुंबलेल्या नदीनाल्यांमधून वाट काढताना फाजील आत्मविश्वास किती जीवघेणा ठरतो, याचे उदाहरण उमरखेडनजीक घडले. नेहमीची वाट माणसाला निर्धास्त बनविते हे खरे असले, तरी संकटात बुद्धीशी वैर परवडणारे नसते. चालकाचा अनुभव प्रवाशांच्या अंगलट आला. नागपूर डेपोची बस सर्वांसमक्ष वाहून गेली. चौघांचा मृत्यू झाला. चालकाला सचेत करण्याचे काम रस्त्यालगतच्या प्रवाशांनी केलेच; बस पुलावरून कलंडल्यानंतर तातडीने पुरात उड्या घेऊन प्रवाशांना वाचविण्याचे हरतऱ्हेचे प्रयत्नही त्यांनी केले. परिचयाच्या नसलेल्या सामान्यांमधील माणुसकीचे दर्शन अशा वेळी घडते. बेभरवशाच्या पावसात गवसलेला असा अनोळखी भरवसा संकटांशी दोन हात करण्याची उमेद पेरतो. छोट्या नदीनाल्यांवरील पुलांचे नियोजन तातडीने मार्गी लागेल, याकडेही लक्ष हवे. राज्यातील शंभर नदीनाल्यांवर 'ब्रिज कम बंधारे' बांधण्याची घोषणा केंद्र सरकारने तीन वर्षांपूर्वी केली होती. विदर्भातील ३५ आणि मराठवाड्यातील ५५ पूल–बंधारे याद्वारे भक्कम होणार होते. समुद्रात जाणारे पाणी थोपविण्यासाठी तीस हजार कोटींचा खर्च योग्य असेल; मात्र छोट्या रस्त्यांवर सामान्यांचे बळी घेणाऱ्या पावसाला रोखण्यासाठीही महत्त्वाकांक्षी योजना हवी. अलीकडील महापुरामुळे राज्यातील रस्ते आणि पुलांचे अंदाजे दोन हजार कोटींचे नुकसान झाल्याचे समजते. राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विचाराधीन असलेली योजना या निमित्ताने कार्यान्वित करायला हवी. पूरनियंत्रण आराखड्यासोबतच आकस्मिक मदतीचे प्रभावी नियोजन हवे. कागदावरील नियोजन पुरात वाहून जाणार नाही याला सर्वोच्च प्राधान्य दिले, तर भरडल्या जिवांचे हाल नक्कीच थोपविता येतील. पाऊस येतो आणि सर्वस्व नेतो, या स्थितीतून बाहेर यायला हवे.

# सभागृहनेते परेश ठाकूर यांचे पत्रकारांनी मानले आभार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून उभारण्यात येणाऱ्या महानगरपालिका मुख्यालयात अद्ययावत पत्रकार कक्ष उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने याकरिता प्रयत्न करणारे महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांचे पत्रकारांनी सदिच्छा भेट घेत आभार व्यक्त केले.

पनवेल महानगरपालिकेच्या सुलभ कामकाजाच्या दृष्टीने व नागरिकांच्या सोयीसुविधांसाठी अद्ययावत मुख्यालयाची आवश्यकता लक्षात घेऊन नवीन पनवेल (पश्चिम) येथील भूखंड क्रमांक ४ सेक्टर १६, क्षेत्रफळ २००८६ चौरस मीटर क्षेत्रफळाचा भूखंड सिडको कडून प्राप्त झाला आहे आणि या भूखंडाकरिता महापालिकेने २५ कोटी ५४ लाख ७२ हजार ७०१ रुपये सिडकोला अदा केले असून सदर भूखंड पनवेल महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात आला आहे.

या भव्य अशा इमारतीस ढोबळ खर्च २८० कोटी रुपये अपेक्षित आहे. या प्रस्तावित इमातीत तळघर, तळमजला, सहा मजले व सहावा वरचा मजला, तसेच टेरेसवर आर्ट गॅलरी आणि अद्ययावत पत्रकार कक्ष उभारण्यात येणार आहे. यासाठी प्रयत्न व सातत्यपूर्ण पाठपुरावा करणारे सभागृहनेते परेश ठाकूर यांचे पत्रकारांनी आभार मानले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, संजय कदम, साहिल रेळेकर, राज भंडारी, हरेश साठे, विशाल सावंत, असीम शेख, अनिल राय आदी उपस्थित होते.

> नागरिकांच्या सोयीसुविधांसाठी व सुलभ कामकाजाकरिता पनवेल महानगरपालिकेचे सर्व सोयीसुविधांयुक्त मुख्यालय प्रत्यक्षात साकार होणार आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारिता क्षेत्राला समाजामध्ये विशेष महत्व आहे. दररोज होणाऱ्या घडामोडी आणि विकासाच्या दृष्टिकोनातून पत्रकार एक समाजहित माध्यम आहे. त्यामुळे मुख्यालयात पत्रकार कक्ष असणे गरजेचे आहे आणि ती गरज या नवीन इमारतीत पूर्ण होणार आहे आणि त्याचा पत्रकारांना फायदा होणार आहे. या इमारतीच्या उभारणीसाठी मौल्यवान मार्गदर्शन करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख, महापौर डॉ. कविता चौतमोल यांचे आभार.
>
> **- सभागृहनेते परेश ठाकूर**

# बीच शॅक्स (चौपाटी कुटी) उभारणीकरिता वरसोली व दिवेआगर येथील शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

संचालक, पर्यटन संचालनालय यांच्या पत्रान्वये शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन निर्णयान्वये राज्यातील समुद्र किनाऱ्यावर पर्यटन वाढीसाठी बीच शॅक्स धोरण जाहीर करण्यात आले असून रायगड जिल्ह्यातील दिवेआगर, ता.श्रीवर्धन व अलिबाग तालुक्यातील वरसोली समुद्र किनाऱ्यावर बीच शॅक्स उभारण्यात येणार आहे.



पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी जिल्ह्यातील पर्यटनवाढीसाठी ध्यास घेतला आहे. त्यापैकी दिवेआगर, ता.श्रीवर्धन व अलिबाग तालुक्यातील वरसोली समुद्रकिनाऱ्यावर बीच शॅक्स प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाहीदेखील प्रलंबित होती. मात्र पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी या विषयाबाबत गांभीर्याने पावले उचलत बीच शॅक्ससाठी शासकीय जमिनी देण्याची कार्यवाही अत्यंत तत्परतेने सुरू केली आहे.

त्याचबरोबर बीच शॅक्स उभारणीसाठी असलेल्या जागांची योग्य निवड व पाहणी करून बीच शॅक्स कार्यान्वित करण्याच्या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर व अलिबाग तालुक्यातील वरसोली समुद्रकिनाऱ्यावर बीच शॅक्स उभारणीसाठी शासकीय जमिनीची मागणी करण्यात आली होती. याबाबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी तातडीने कार्यवाही सुरू करण्याबाबत जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले.

त्यानुसार मौजे वरसोली, ता.अलिबाग, जि.रायगड येथील स.नं./हि.नं.६/१/अ, एकूण क्षेत्र ८–२२–० हे.आर. पैकी १–६०–० हे.आर.क्षेत्र ग्रुप ग्रामपंचायत वरसोली, ता.अलिबाग यांच्याकडून शासनाकडे पुर्नग्रहण करुन तसेच मौजे दिवेआगर, ता.श्रीवर्धन येथील गट नंबर ७९६ क्षेत्र ६५.४९.०० हे.आर.पैकी दिवेआगर ग्रामपंचायत यांच्याकडे निहीत असलेले ५६.२३.४० या क्षेत्रापैकी १.६०.०० हे.आर. क्षेत्र ग्रामपंचायत दिवेआगर यांच्याकडून शासनाकडे पुर्नग्रहण करुन संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र शासन यांना बीच शॅक्स (चौपाटी कुटी) उभारणीकरिता तात्पुरत्या स्वरुपात वापर करण्यासे मान्यतेचे आदेश जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी नुकतेच जारी केले आहेत. यामुळे जिल्ह्यातील पर्यटनवाढीस अधिकाधिक गती मिळणार असून रायगड जिल्ह्यात पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगारही उपलब्ध होणार आहे.

# स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सवानिमित्त उरण न्यायालयाचे विविध उपक्रम

**दै.रायगड नगरी । उरण**

भारताच्या स्वातंत्र्याचे ७५ वे वर्ष असून या निमित्त संपूर्ण भारतभर आझादी का अमृतमहोत्सव हा उपक्रम सुरू असून त्याच अनुषंगाने उरण न्यायालयातर्फे संपूर्ण उरण तालुक्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. २ आक्टोबर ते १४ नोहेंबर २०२१पर्यंत हे उपक्रम सूरू राहणार आहेत.

यामध्ये कायद्या बद्दल जनजागृती करण्यासाठी रॅली, कायदेविषयक जन जागृती करण्यासाठी गाव पातळीवर उपक्रम, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाबाबतची माहिती, मोफत विधी सेवा बाबत माहिती देणे, केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे, महिलांच्या हक्कांची जनजागृती करणे या आणि आदि विषयांवर या दरम्यान विविध उपक्रम तसेच पथनाट्यांतून जनजागृती करण्यात येणार असल्याची माहिती क स्तर दिवाणी न्यायाधिश निलेश वाली, सह दिवाणी न्यायाधिश आर.बी. करडे आणि सह न्यायाधिश श्रीमती पी.ए. पाठाडे यांनी दिली. या उपक्रमांचा जास्तीत जास्त नागरीकांनी लाभ घ्यावा असे आवाहन देखिल त्यांनी केले आहे.


## जाहीर नोटीस

उरण येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात

क्रिमिनल एम.ए.नं.१३५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/११/२०२१

श्री.शंकर बाळू कडू
वय : ७६ वर्षे, धंदा : नोकरी
सोनारी, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रामपंचायत सोनारी
ता.उरण, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील कै.बाळू पुना कडू यांचा मृत्यू दि.१०/११/१९७७ रोजी मु.सोनारी, ता.उरण, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी सोनारी येथे झाला आहे. कै.बाळू पुना कडू यांचा मृत्यूचा दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार यांनी मे.उरण येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात केला आहे.

सदरबाबत अर्जदार यांस मृत्यूचा दाखला देण्यास कुणाची हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाची आहे. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केली नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नांवे मृत्यूचा दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सही/– क.लिपीक फौ.न्याया, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, उरण

वकील : आर.आर.यादव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मुजावर साहेब दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

चौ.अर्ज.८९९/२०२१
नि.नं.८
ने.ता.२७/१०/२०२१

विजया विलास हंबीर — अर्जदार
विरुद्ध
सुनंदा हरिश्चंद्र हंबीर
अंजली विलास हंबीर
श्रुती विलास हंबीर
प्रणव विलास हंबीर
अश्विनी विलास हंबीर — गै.अर्जदार

अर्जदार यांचे पती कै.विलास हरिश्चंद्र हंबी हे दि.१९/१२/२०२० रोजी मुंबई येथे निधन झाले असून, सदर मयताच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :–

**मिळकतीचे वर्णन**

Flat No.1 on 2 nd floor, shambhavi building No.B-6 Omkar-reshwar gruh sankul, Panvel, Raigad & any other property within the jurisdiction of panvel

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांचा वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मिळकतीचे वारस म्हणून दाखला दिला जाईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२७ माहे सप्टेंबर २०२१ रोजी माझे सहीने दिले.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मिळकत ही श्री.बंडू गणपत म्हात्रे वगैरे ५ यांचे नावे महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| बंडू गणपत म्हात्रे वगैरे ५ | १०१/१/२<br>१०१/२/३/२ | ०–५४–६०<br>०–४०–०० | ४–६१<br>२–६४ |

मौजे : करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार श्री.बंडू गणपत म्हात्रे यांची वरील नमूद केलेली शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ९ दिवसांच्या आत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले जमीन मालक/कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेली कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दि.३०/०९/२०२१**

**सही/–**
**मयुरेश प्र.हनुमंते**
**ॲडव्होकेट–हायकोर्ट**
**शॉप नं.बी/१०१, योगेश्वर कृपा बिल्डींग, ठाणा नाका, रोड, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे : सवणे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खाली सविस्तरपणे नमूद केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : सवणे, ता.पनवेल, जि.रायगड**

| जमीन मालकाचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ताराबाई शिवराम देशमुख | ३०/१ | ०–५२–१० | ३.८१ |

तरी सदरहू वर नमूद मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.३०/०९/२०२१

**सही/–**
**सुवर्णा म. वत्सराज**
**ॲडव्होकेट, पनवेल**

**पत्रव्यवहाराचा पत्ता : फ्लॅट नं.३०४, आदित्य विहार सोसायटी, जुन्या पोस्टाजवळ, महात्मा फुले रोड, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६**
**फोन नं.९८३३६३९०४१**

वकील : ए. के. साहू

## जाहीर नोटीस

वाशी येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात

ओ.एम.ए.क्र.५६/२०२१

श्री.दिलीप दगडू चव्हाण
वय : ६२ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
रा.श्री लाल कृपा सीएचएस लि, बी–२०३,
प्लॉट नं.४३, सेक्टर–४२, सीवूड, नेरुळ,
नवी मुंबई–४००७०६ — अर्जदार
विरुद्ध
नवी मुंबई महानगरपालिका
आरोग्य खाते (जन्म मृत्यू विभाग)
नेरुळ, नवी मुंबई, ता. व जि.ठाणे — सामनेवाले

वरील अर्जदार यांचे आई कै.कृष्णाबाई दगडू चव्हाण हिचा मृत्यू दि.११/०६/२०१७ रोजी श्री लाल कृपा सीएचएस लि., बी–२०३, प्लॉट नं.४३, सेक्टर ४२, सीवूड, नेरुळ, नवी मुंबई–४००७०६ येथील राहत्या घरी झालेला आहे. सदर मयताचे मृत्यूची नोंद त्यावेळी नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य खाते (जन्म–मृत्यू विभाग) नवी मुंबई, ता. व जि.ठाणे यांच्या कार्यालयात झालेली नसल्याने अर्जदाराने मयताचे मृत्यूदाखला मिळणेकरिता सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे, असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मृत्यूदाखल्याबाबत कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने लेखी हरकत ही जाहीर नोटीस ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मृत्यू दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

दि.३०/०९/२०२१

सही/– क.लिपीक दि.न्याया, वाशी — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्याया, वाशी

मा.गोडसे मॅडम

प्रो.जमा. २–२५ — अर्जदाराचे वकील ॲड.श्रुती द. शिंदे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१२३५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२६/१०/२०२१

कै.दत्ता चंदर बहिरा तर्फे वारस
१) श्रीम.शैला दत्ता बहिरा
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.प्राची दत्ता बहिरा
वय : २३ वर्षे, धंदा : शिक्षण
वरील क्र.१ व २
रा.गोविंद निवास, गोदरेज स्काय गार्डन जवळ,
तक्का गाव, पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.दत्ता चंदर बहिरा हे दि.२१/१/२०१८ रोजी मौजे : किंग एडवर्ड मेमोरिय हॉस्पिटल, मुंबई येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गाडीचा नंबर | चेसीस नं. | इंजिन नं. | मॉडेल, कंपनी |
|---|---|---|---|
| MH 46 Y 0098 | ME4JF392GD7006469 | JF39E70006197 | DIO, HONDA |
| MH 46 AT 2836 | ME4JF505CGT225860 | JF50ET3226242 | ACTIVA 3G, HONDA |

कै.दत्ता चंदर बहिरा यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ३०/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल


पृष्ठ क्र.१ वरुन...

## मोदी सरकारचा सर्वसामान्यांना मोठा धक्का

मुंबई, दिल्ली यासारख्या मोठ्या शहरांमध्ये सीएनजी आणि पाईप गॅसच्या दरात १०–११ टक्क्यांची वाढ होईल, अशी माहिती मिंटनं उद्योग जगतातील सुत्रांच्या हवाल्यानं दिलं आहे. वीज उत्पादनासाठीदेखील नैसर्गिक वायूचा वापर होतो. मात्र यामुळे ग्राहकांना फारसा फटका बसणार नाही. नैसर्गिक वायूच्या मदतीनं तयार होणाऱ्या विजेचं प्रमाण कमी असल्यानं ग्राहकांच्या खिशावर बोजा पडणार नाही. मात्र खतांच्या उत्पादनासाठी येणारा खर्च वाढू शकतो. त्याचा परिणाम खतांच्या किमतींवर होईल.

## केंद्र सरकार काही राज्यांना न मागता हजारो कोटींचे पॅकेज देते : अजित पवार

आकडे प्राप्त झाल्यानंतर सरकार निर्णय घेईल. एनडीआरएफ आणि एसडीआरएफचे निकष पाहून मदत करण्याची आमची भूमिका आहे. सर्व पालकमंत्री आपापल्या जिल्ह्यांच्या दौऱ्यावर असून शेतकऱ्यांशी संवाद साधून प्रशासनाला योग्य ते निर्देश देत आहोत, असेही अजित पवार यांनी सांगितले.

केंद्र सरकारकडे मदतीची मागणी करताना शेतकऱ्यांच्या नुकसानाचा अंदाज घेऊन मागणी केली जाते. मात्र किती मदत द्यायची हा सर्वस्वी केंद्राचा निर्णय आहे. काही काही राज्यांना केंद्राने न मागता स्वतःहून हजारो कोटींचे पॅकेज दिले होते. केंद्र सरकार हे संपूर्ण देशाचे आहे. त्यामुळे कोणत्याही राज्यासोबत दुजाभाव न करता मदत दिली पाहिजे, असेही अजित पवार म्हणाले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार अलिबाग यांच्या निवासस्थानाकरिता शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिलदार कार्यालय ही नागरिकांसाठी क्षेत्रीय स्तरावरील अत्यंत महत्त्वाची कार्यालये मानली जातात. या कार्यालयातून जनतेची महसूलविषयक सर्व प्रकारची महत्त्वाची कामे केली जातात. त्याचप्रमाणे अलिबाग हे जिल्हा मुख्यालयाचे ठिकाण असून नैसर्गिक आपत्ती, निवडणूक कालावधीत रात्री-अपरात्री तसेच इतर महत्वाच्या कामानिमित्त रात्रंदिवस शासकीय कामकाज करावे लागते. या कार्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांबाबतीतील ही वस्तुस्थिती लक्षात घेता त्यांच्याकरिता सुस्थितीतील शासकीय निवासस्थाने असणे, ही बाबही तितकीच महत्वाची आहे.

या उद्देशाने पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी या विषयाचा पाठपुरावा करुन जिल्हा प्रशासनास त्याप्रमाणे निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांच्या निवासस्थानाकरिता मौजे वरसोली, ता.अलिबाग येथील स.नं./हि.नं.२३८/२/अ२/१ क्षेत्र ०.१९.८० हे.आर. इतके क्षेत्र ०८ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयानुसार भोगाधिकार मूल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने कब्जा हक्काने उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांच्या निवासस्थानाच्या बांधकामाकरिता हस्तांतरित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी नुकतेच जारी केले आहेत.

यामुळे खऱ्या अर्थाने महसूल प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या राहण्याचा प्रश्न मिटण्यास हातभार लागणार असून त्यामुळे त्यांचे कामकाज गतिमान होऊन जनतेला सोयी सुविधा सुलभतेने मिळतील. विविध प्रशासकीय कार्यालयांच्या नव्या इमारतीसाठी व अद्ययावतीकरणासाठी तसेच अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या प्रश्नांसाठी पालकमंत्री कु.आदिती तटकरे करीत असलेल्या पाठपुराव्यामुळे प्रशासन निश्चितच गतिमान होण्यास मोठा हातभार लागणार आहे. यामुळे जिल्ह्यातील जनतेमध्ये पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या कामाविषयी सर्वत्र समाधान व्यक्त केले जात आहे.

## अखेर सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल घेऊन साळाव-बिर्लामंदीर रस्त्यावरील बुजविले खड्डे

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील साळाव- रोहा रस्त्यावरील साळाव ते बिर्लामंदीर रस्त्यावर अतिवृष्टी व पावसामुळे पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहनचालक व प्रवाशांना होणारा त्रास लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल घेऊन खड्डे बुजविण्यात आल्याने समाधान व्यक्त होत आहे.

पावसाळ्यात मागील महिन्यात झालेल्या अतिवृष्टी व पावसामुळे या रस्त्याची पार दुरावस्था होऊन जागोजागी खाच खळगे व खड्डे पडले होते. यामुळे वाहनचालक व प्रवाशांना त्रास सहन करावा लागत होता.

याबाबत वाहनचालक व प्रवासी वर्गातून उपाययोजना करण्याची मागणी केली जात होती. याची सार्वजनिक बांधकाम उपविभागाने तातडीने दखल घेऊन साळाव-बिर्लामंदीर रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात आल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

# कोरोना महामारीच्या काळात मदत कार्य सुरू ठेवून कौतुकास्पद कामगिरी करणाऱ्यांचा सत्कार

**दै.रायगड नगरी । पनवेल**



जय हिंद फाऊंडेशनच्यावतीने शौर्य दिनानिमीत्त देशभरात विविध उपक्रम राबविण्यात आले. त्याअंतर्गत फाऊंडेशनच्या वतीने कोरोना महामारीच्या काळात आपले मदत कार्य सुरु ठेवत कौतुकास्पद कामगिरी करणाऱ्या आजी माजी सैनिक, पोलिस आधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सत्कार सोहळा बुधवारी आयोजीत करण्यात आला होता. हा सत्कार सोहळा भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि सीडब्लूएच्या सेक्टर हेड रितु दत्ता यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

पाकिस्तानने भारताच्या उरी या लष्करी केंद्रावर हल्ला केल्याच्या पार्श्वभूमीवर भारताने २८ सप्टेंबर २०१६ च्या मध्यरात्री पाकव्याप्त काश्मीरमध्ये दहशतवाद्यांच्या तळावर हल्ला केला. यात भारतात घुसखोरीस सज्ज असलेले अनेक दहशतवादी ठार झाले. हा दिवस देशभरात शौर्य दिन म्हणून साजरा केला जातो. त्याअंतर्गत या दिनाचे औचित्य साधत २०१७ पासून जय हिंद फाऊंडेशनच्यावतीने दरवर्षी शहीद माता पिता आणि पत्नीसांठी आणि त्यांच्या परिवारासठी विविध समाजिक उपक्रम राबविलेल जातात. त्याअंतर्गत फाऊंडेशनाच्या वतीने कोरोना महामारीच्या काळाता आपल्या जिवाची पर्वा न करता आपले मदत कार्य सुरु ठेवणारे आजी माजी सैनिक, सीआरपीएफ, मुंबई आणि नवी मुंबई पोलिसचे अधिकारी आणि कर्मचार्यांच्या सत्कार करण्यात आला. तसेच वांगणी रेल्वे स्थानकात स्वत:च्या जीवाची बाजी लावत एका लहान मुलाचा जीव वाचवणारे मयुर शेळके, ५० आदिवासी मुलांना दत्तक घेणाऱ्या मुंबई पोलिस दलाच्या महिला कर्मचारी रेहाना शेख आणि अलिबाग येथे प्रवासी वाहतुक बोटीच्या अपघातात ८० जणांचे प्राण वाचवणारे रायगड पोलिस दलातील प्रशांत घरत यांचा विशेष कौतुक म्हणून सन्मान करण्यात आला.

खारघर येथील लॅण्डमार्क बिल्डींगमध्ये आयजित करण्यात आलेल्या या सत्कार सोहळ्यामध्ये सर्व सन्मानकर्त्यांना मान्यवरांच्या हस्ते भारतीय सविधानाची प्रत आणि प्रमाणपत्र देऊन त्यांना गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला जय हिंद फाऊंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप माने, सचीव हनुमंत मांढरे, संस्थापकीय सदस्य वैशाली माने, पनवेल महापालिकेचे नगरसेवक ॲड. नरेश ठाकूर, भारतीय जनता पार्टीचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, ॲड. भाउसाहेब जाधव, नामदेव मुंडे यांच्यासह पदधिकारी, आजी माजी सैनिक, पोलिस अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# पाढे पाठांतर स्पर्धेत मराठी प्राथमिक विद्यालय अव्वल

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

महाराष्ट्र शासनाचे मराठी विकास संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय अंक व पाढे पाठांतराच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत सुधागड एज्युकेशन सोसायटीचे कळंबोली येथील मराठी प्राथमिक विद्यालयातील तीन मुलांनी व एका शिक्षिकेने अव्वल स्थानी क्रमांक मिळवून विद्यालयाचे नाव चमकवले आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले आहे. विद्यालयाच्या वतीने गुणवंत विद्यार्थी व शिक्षिका अंजली मढवी यांचाही गुणगौरव विद्यालयाच्या मुख्याध्यापिका हेमलता पाटील यांनी केला आहे. विद्यार्थी व शिक्षकांचे शैक्षणिक स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

लॉक डाऊन च्या काळात शाळेची घंटा वाजलीच नाही. त्यामुळे विद्यार्थी व शाळा आणि शिक्षकांचे नाते फक्त ऑनलाईन मोबाईल द्रारेच राहिले .मात्र यामध्येही विद्यार्थी हा घडला जावा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये ह्यासाठी विद्यालय व विद्यालयातील शिक्षकांनी अपार मेहनत घेऊन विद्यार्थ्यांना घडविले. २१ व्या शतकात पाढे पाठांतर करणे हा एक फार भाग दुर्मिळ बनला आहे. पूर्वीप्रमाणे सायंकाळचे पाढे म्हणण्याची पद्धत आता कालबाह्य होत चालली आहे. मात्र याही काळात मुलांचे पाढे पाठ व्हावे यासाठी कळंबोलीतील मराठी प्राथमिक विद्यालय हे खूप मेहनत घेऊन विद्यार्थ्यांकडून अंक आकडे व पाढे पाठ करून घेत आहेत. यासाठी विद्यालय कडून विविध उपक्रमही राबवले जात आहेत.

शासनाच्या मराठी विकास संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय पाढे व अंक पाठांतर स्पर्धा घेण्यात आल्या. सदरच्या स्पर्धा या ऑनलाईन पद्धतीने झाल्या त्यामध्ये कळंबोलीतील मराठी प्राथमिक विद्यालयातील श्रेया राहुल शिंदे, सृष्टी मोहन मूढे आरोही दीपक मेठे या विद्यार्थ्यांनी व अंजली रोहिदास मढवी शिक्षकांनी सहभाग घेतला होता. या राज्यस्तरीय स्पर्धेत विद्यालयातील इयत्ता तिसरीच्या वर्गातील मुलांनी स्पर्धेत चांगली कामगिरी करून अव्वल स्थान पटकावले आहे. त्यामुळे विद्यालय संस्था व जिल्ह्याचे नाव उंचावण्याचे काम या गुणवंत विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या व स्पर्धेत अव्वल स्थान पटकावणाऱ्या सहाय्यक शिक्षिका अंजली मढवी यांनी केले आहे. त्यामुळे संस्था व विद्यालयाच्या वतीने गुणवंत शिक्षक विद्यार्थी व शिक्षकांचा ही या सन्मान गुरुवारी विद्यालयात करण्यात आला. या विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष वसंत ओसवाल, उपाध्यक्ष रविंद्र लिमये, सचिव रविकांत घोसाळकर, कळंबोली विद्या संकुलाचे प्रमुख राजेंद्र पालवे खाजगी प्राथमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष संदीप कदम यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे व विद्यालयाचे अभिनंदन केले आहे.



# रोहा तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या उपाध्यक्षपदी सोनाली वाचकवडे

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाची बैठक किल्ला येथे संपन्न झाली. यावेळी पक्ष वाढविण्याच्या दृष्टीने तसेच आगामी येणाऱ्या निवडणुका याबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीत कोलाड आंबेवाडी येथील सौ. सोनाली राजेंद्र वाचकवडे यांची रोहा तालुका राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या उपाध्यक्षपदी निवड केल्याचे नियुक्ती पत्रक खासदार सुनिलजी तटकरे यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी रायगडच्या पालकमंत्री आदितीताई तटकरे, आमदार अनिकेत भाई तटकरे, कार्याध्यक्ष मधुकर पाटील, प्रदेश सरचिटणीस विजय मोरे, तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, उपसभापती रामचंद्र सकपाळ, सुरेश मगर, नारायण धनवी, रामचंद्र चितळकर, शिवराम शिंदे, सुरेश महाबळे, रिजवान शेटे, भाई टके, महेंद्र गुजर, शहराध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, अध्यक्ष जयवंत मुंढे, सौ. पाटील, तसेच राष्ट्रवादीचे विविध परिसरातील कार्यकर्ते उपस्थित होते. रोहा तालुका महिला उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर सोनाली वाचकवडे यांनी सांगितले की खासदार सुनिलजी तटकरे, पालकमंत्री आदिती ताई तटकरे, आमदार अनिकेत भाई तटकरे यांनी माझ्यावर विश्वास टाकून माझी निवड केली आहे त्याबद्दल मी त्यांचे आभारी असून पक्ष वाढविण्यासाठी मी प्रामाणिक पणे जास्तीत जास्त प्रयत्न करून सर्वांना बरोबर घेऊन पक्ष प्रत्येक वाड्यांमध्ये कसा वाढेल यासाठी सदैव प्रयत्न करेन.

---

अर्जदाराचे वकील : ॲड.विक्रम भी. पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१२६०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०८/११/२०२१

कै.जिवाजी लक्ष्मण परब (मयत) यांचे वारस
१) श्री.नितीन जिवाजी परब
वय : ६० वर्षे, व्यवसाय : नोकरी धंदा
रा.८-ए, कृषी सोसायटी, सेनापती बापट रोड,
वी.के.पाटील शाळा समोर, गोखले नगर,
पुणे शहर, मोडेल कॉलोनी पुणे, ४११०१६
२) श्री.प्रवीण जिवाजी परब
वय : ५८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट नं.५०४, झेनो समिट जयहिंद एन्कलेव,
जयहिंद गांधी रोड, माधापूर, तेलंगणा ५०००८१ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार हे कै. जिवाजी लक्ष्मण परब यांचा दि.१०/०८/२०१९ रोजी मु.फ्लॅट नं.५०४, झेनो सुमि जयहिंद एन्कलेव, जयहिंद गांधी रोड, माधापूर, हैद्राबाद येथे मयत झाले आहे. तसेच त्यांची पत्नी कै.शुभांगी जिवाजी परब यांचा दि.०२/०४/२०१४ मु. C-अ कृषी सोसायटी पुणे १६ येथे मयत झाले व तसेच त्यांची आई कै. लक्ष्मी लक्ष्मण परब यांचा दि.२१/०७/१९७३ मु.मुंबई येथे राहत्या घरी मयत झाले.

मयत कै.जिवाजी लक्ष्मण परब यांचे मालकीचे फ्लॅट मिळकत मौजे : रोडपाली, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची फ्लॅट मिळकत होती व आहे.

**मौजे : रोडपाली, तालुका : पनवेल, जि.रायगड येथील फ्लॅट मिळकतीचे वर्णन**

| मौजे | फ्लॅट क्रं. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| रोडपाली | फ्लॅट नं.७०५, सातवा मजला, मा.लक्ष्मी हाईटस्, प्लॉट नं.६२ ते ६६, सेक्टर २० | ५५.७६७ चौ.मी. कारपेट + टेरेस २.९०८ |

अर्जदार हे कै.जिवाजी लक्ष्मण परब यांचे कायदेशीर वारसदार आहे. कै. जिवाजी लक्ष्मण परब यांचे अर्जदार हेच त्यांचे वारदार आहे. असा ''वारस दाखला'' आवश्यक असल्याने अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे. त्याबाबत कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या कालावधीत मे.कोर्टात हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. वर नमूद कालावधीत हरकत न आल्यास अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२८/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे मॅडम

वकील : आर.एल.राऊत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१२४७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२९/१०/२०२१

१) श्रीमती.संगीता हनमंत आगवणे
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.अभिजीत हनमंत आगवणे
वय : २६ वर्षे, धंदा : काहीही नाही
३) कुमारी अदिती हनमंत आगवणे
वय : २४ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.अदित्य हनमंत आगवणे
वय : १८ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.फ्लॅट नं.१०३, १ ला मजला,
प्रतिक ॲवेन्यू, प्लॉट नं.६५,
सेक्टर १७, गाव-उलवे, नवी मुंबई
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी वरील अर्जदार क्रं.१ ते ४ यांनी मयत हनमंत अनंदा आगवणे, यांचे दि.०९/०५/२०२१ रोजी सुयश हॉस्पिटल, सेक्टर-४०, सीवूड (प.) नेरुळ, नवी मुंबई येथे निधन झाले असून अर्जदारांनी मयताचे नावे असलेल्या मिळकती बाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दिला आहे. सदर मयत हनमंत अनंदा आगवणे यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :

**मिळकतीचे वर्णन**

Flat bearing No.103, on the 1 st Floor, adm. about 56.603 Sq. Mtr. (Built Up Area) + 22.620 Sq. Mtr. (Terrace Area) Building known as "Pratik Avenue" constructed on Plot No.65, Sector-17, at Village-Ulwe, Navi Mumbai, Taluka-Panvel, District-Raigad, valued at Rs.49,90,000/- (Rupees Forty Nine Lakhs Ninety Thousand Only) and also having Share Certificate bearing its no.09 Share No.41 to 45 of Rs.500/-

(Totally valued at Rs.49,90,000/-+Rs.500= Rs.49,90,500/- (Rupees Forty Nine Lakhs Ninety Thousand and Five Hundred Only)

ज्याअर्थी सदरहू अर्जदार क्रं.१ ते ४ हे मयत हनमंत अनंदा आगवणे यांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्यांनी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य ती हरकत न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार क्रं.१ ते ४ यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास सदरहू मयताचे वरील मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.३०/०९/२०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मे.भाकरे साहेब यांचे कोर्टात

अर्जदारातर्फे वकील
ॲड.नागेश अरविंद हिरवे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व) स्तर पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज.क्र.१३०६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०७/१२/२०२१

कै.अशोक कृष्णाजी पाटील (मयत) तर्फे वारस
१) सौ.मंगल नारायण चवरकर
रा.घर नं.११८२, नामदेव नगर,
पोयनाड, ता.अलिबाग, जिल्हा : रायगड
२) सौ.नुतन गजानन म्हात्रे
रा.१३०, म्हात्रे पाडा, एम.आय.डी.सी.फेज-२
डोंबिवली पूर्व, कल्याण, ठाणे
३) कै.सचिन अशोक पाटील तर्फे वारस,
३.१) श्रीमती.अर्चना सचिन पाटील
३.२) कु.समृद्धी सचिन पाटील
४) कै.विवेक अशोक पाटील तर्फे वारस
४.१) श्रीमती.क्षमा विवेक पाटील
४.२) कु.क्षम्वि विवेक पाटील
(अर्जदार क्र.३.१, ३.२, ४.१ व ४.२ सर्व राहणार)
फ्लॅट नं.२०, लोखंडीपाडा, गीतांजली
को.ऑप.हौ. सोसा., ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.अशोक कृष्णाजी पाटील यांचे निधन दि.२४/०३/२०१६ रोजी एम.जी.एम.हॉस्पिटल, कळंबोली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे झाला. कै.अशोक कृष्णाजी पाटील यांचा ताबे कब्जा व वहिवाटीतील निवासी सदनिका मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**निवासी सदनिका मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट नं.१९, फायनल प्लॉट क्र.८९,**
**दुसरा मजला, बी विंग,**
**गीतांजली को.ऑप.हौ.सोसायटी,**
**लोखंडीपाडा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, पिन नं.४१०२०६**
**(कार्पेट एरिया ३५० चौ.फूट)**

कै.अशोक कृष्णाजी पाटील यांचे मृत्यूपश्चात त्यास अर्जदार क्र.१ ते ४.२ हेच कायदेशीर वारस आहेत. सबब सदरचा वारस दाखला मिळणेकामी अर्जदारांनी सदर अर्ज या मे.न्यायालयात दाखल केला आहे. सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत आपल्या हरकती या मे.न्यायालयात सादर कराव्यात.

जर सदरहू मुदतीत कोणीही योग्य हरकती दाखविल्या नाही तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयत कै.अशोक कृष्णाजी पाटील यांचे वारस घोषित करून अर्जदारांना वारस दाखला देण्यात येईल, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

सदर नोटीस आज दि.३०/०९/२०२१ रोजी न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे मॅडम

प्रो.जमा ६-२५

अर्जदाराचे वकील : ॲड.विजय गडगे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो.यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१३१२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०९/११/२०२१

श्री.जनार्दन सखाराम तांडेल
वय : ६७ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.जासई, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

ज्याअर्थी कै.ताईबाई उर्फ ताई सखाराम तांडेल ही दि.०२/१०/१९५६ रोजी मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड येथे तिच्या राहत्या घरी मृत्यू पावली आहे. अर्जात नमूद केलेल्या संपादीत मिळकती ह्या कै.ताईबाई उर्फ ताई सखाराम तांडेल हिच्या वडिलोपार्जित मिळकती असून त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्रं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| १ | ११ | २ | ०-१३-९ |
| २ | २२० | १२ | ०-६-६ |
| ३ | १३० | ५ | ०-८-८ |
| ४ | २०१ | १ अ | ०-३०-९ |
| ५ | २०७ | ४ | ०-६-१२ |
| ६ | २१० | १० | ०-१२-१२ |
| ७ | २१२ | ११ | ०-६-१२ |
| ८ | २१२ | १३ | ०-१५-४ |
| ९ | २१७ | १७ | ०-२-८ |
| १० | २०७ | १३ | ०-२८-४ |
| ११ | ३२ | ६ | ०-२-४ |
| १२ | ८२ | ४ | ०-१०-८ |
| १३ | १११ | १७ | ०-३-५ |
| १४ | ११४ | ६ | ०-२-३ |
| १५ | ११५ | २६ | ०-३-३ |
| १६ | १२८ | २ | ०-५-० |
| १७ | १२८ | १९ | ०-५-३ |
| १८ | १३१ | ३ | ०-२-८ |
| १९ | १५९ | ५ | ०-३-३ |
| २० | १६० | ११ | ०-१६-४ |
| २१ | १९८ | ३ | ०-९-९ |
| २२ | २०७ | २ | ०-४-३ |
| २३ | २१० | ७ | ०-३४-४ |
| २४ | २०८ | ९ | ०-६-८ |
| २५ | ७ | ६ | ०-५-० |
| २६ | २२० | ६ | ०-०-२० |
| २७ | ४१ | ११ | ०-१०-१२ |
| २८ | १३२ | १३ | ०-९-२ |
| २९ | २०१ | १ क | ०-१५-४ |
| ३० | २०८ | ५ | ०-१६-५ |
| ३१ | २०८ | ७ | ०-९-९ |
| ३२ | २०८ | ८ | ०-४-० |
| ३३ | २०९ | १ ब | ०-३३-५ |
| ३४ | २१० | १० | ०-१२-९ |
| ३५ | २१० | १२ | ०-६-८ |
| ३६ | १२८ | १ | ०-२-० |
| ३७ | ६५ | ४ | ०-१०-८ |
| ३८ | ११४ | १५ | ०-५-० |
| ३९ | ११४ | १७ | ०-३-४ |
| ४० | १३२ | १२ | ०-५-१२ |
| ४१ | २०७ | १७ | ०-१३-७ |
| ४२ | २०९ | १ अ | ०-३-० |
| ४३ | २६ | ७ | ०-२१-८ |
| ४४ | १०८ | ५ | ०-३-८ |
| ४५ | १०२ | ११ | ०-५-० |
| ४६ | १४७ | ११ | ०-२-८ |
| ४७ | ३७ | ४ | ०-६-१० |
| ४८ | ९८ | ८ | ०-७-८ |
| ४९ | १२३ | ९ | ०-१-८ |
| ५० | १३९ | ४ | ०-१२-०० |
| ५१ | ४१ | १० | ०-१०-९ |
| ५२ | १८५ | ३ | ०-१-० |
| ५३ | १८८ | २ | ०-१४-८ |
| ५४ | २१३ | ३ | ०-११-६ |
| ५५ | १११ | १५ | ०-२-० |
| ५६ | १११ | १६ | ०-७-६ |
| ५७ | १०५ | २३ | ०-१-८ |
| ५८ | २१५ | ० | ०-६-८ |
| ५९ | १ | ३ ब | ०-११-८ |
| ६० | २०७ | ८ | ०-६-८ |
| ६१ | २६ | ८ | ०-६-८ |
| ६२ | १०२ | १२ | ०-४-० |
| ६३ | २२० | ७ | ०-१-० |
| ६४ | २१७ | ७ | ०-९-६ |
| ६५ | १८३ | ३ | ०-५-५ |
| ६६ | २१० | १ | ०-१५-० |
| ६७ | १९ | २ | ०-५-३ |

ज्याअर्थी कै.ताईबाई सखाराम तांडेल हिचे मृत्यूपश्चात त्यास अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ३०/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## व्हेंचर फाऊंडेशनतर्फे अंधेरी (पश्चिम) येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या व्हेंचर फाऊंडेशनतर्फे अंधेरी (पश्चिम) मुंबई,जे.पी.रोड, नवरंग सिनेमा मागे, गावदेवी गणेश मित्र मंडळ–डोंगरी येथे रविवार दि.१० आक्टोबर २०२१ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष विक्रांत राऊळ यांनी दिली. व्हेंचर फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विक्रांत राऊळ, राष्ट्रीय सचीव अल्ताफ सय्यद, शिवसेना महिला उपविभाग संघटक संजीवनी घोसाळकर, शाखाप्रमुख उदय महाले तसेच तज्ञ डॉ.चंद्रशेखर नेरकर व डॉ.दिपिका वर्मा मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत. तरी अंधेरी (पश्चिम) परीसरातील लोकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा. असे निमंत्रक श्रीगावदेवी सुधार समिती यांनी कळविले आहे.

## ११५ झाडांचे वृक्षारोपण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा वरसई ता पेण जि रायगड व मैत्री बोध परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने ११५ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमास एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे सहाय्यक प्रकल्पाधिकारी शेरमकर, विस्ताराधिकारी वाघ, वरसई ग्रामपंचायतीचे सरपंच निराताई वीर ,उपसरपंच रुपेश जाधव, माजी सरपंच होजगे, शाळा व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष जयंत सुतक, आदिवासी ठाकूर, संघटना पेण अध्यक्ष जोमा दरवडा, वरसईचे ग्रामस्थ योगेश पाटील, सुभाष शिंदे, मैत्री बोध परिवाराचे सदस्य ऋग्वेद सावंत, शाळेचे मुख्याध्यापक जानकर सर, अधीक्षक किरण वारे, शिक्षक वृंद व कर्मचारी यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# पोलीस भरतीच्या लेखी परिक्षेत तोतयेगिरी करणाऱ्या दोन परिक्षार्थ्यांवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पोलीस भरतीसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेदरम्यान दोन उमेदवारांनी आपल्या प्रश्न पत्रिकांची अदलाबदल करुन परिक्षा पेपर लिहीण्यासाठी एकमेकांना मदत केल्याचे आढळुन आल्याने या परिक्षार्थीं विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. करण सोमनाथ वेताळ (२५) व अजित शांताराम वाघमोडे (२८) अशी या दोघांची नावे असून सीसीटीव्ही फुटेजमुळे हा प्रकार निर्दशनास आल्यानंतर या दोघांवर ही कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या १०३ पोलीस शिपाई चालक (गट–क) व ६१ पोलीस शिपाई या पदासाठी भरती प्रक्रिया सुरुवात करण्यात आली आहे. २२ सफ्टेंबर रोजी पोलीस शिपाई चालक या पदासाठी १२ परिक्षा केंद्रावर लेखी परिक्षा घेण्यात आली होती. त्यानंतर पोलीस शिपाई या पदासाठी २४ सप्टेंबर रोजी १२ परिक्षा केंद्रावर लेखी परिक्षा घेण्यात आली. या १२ परिक्षाकेंद्रापैकी खारघर सेक्टर–४ मधील एसी.पाटील कॉलेज मधील परिक्षा केंद्रावर परिक्षा चालु असतांना रुम नंबर ३२३ मधील करण सोमनाथ वेताळ (२५) व अजित शांताराम वाघमोडे (२८) हे दोन परिक्षार्थी आपसात परिक्षा पेपरची अदलाबदली करुन एकमेकांना मदत करत असल्याचे सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करणाऱ्या पोलीस अंमलदारांच्या निदर्शनास आले. याबाबतची माहिती सदर परीक्षा केंद्रावर नियुक्त वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सीसीटीव्ही कमेरा फुटेजची तपासणी करुन त्याबाबत खात्री केली. त्यानंतर दोन्ही परिक्षार्थ्यांकडील प्रश्नपत्रीका ताब्यात घेऊन दोन्ही परिक्षार्थ्यांना ताब्यात घेतले. या दोन्ही परिक्षार्थींनी पोलीस भरतीच्या लेखी परिक्षे दरम्यान स्वत:चा फायदा व्हावा यासाठी एकमेकांच्या परिक्षा पेपरची अदलाबदल करुन तोतयेगिरी करुन शासनाची फसवणुक केल्याचे आढळून आल्याने या दोन्ही परिक्षार्थ्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस भरतीची लेखी परीक्षा शांततेत व निर्विघ्न वातावरणात पार पडाव्यात यासाठी सर्व १२ परीक्षा केंद्र व त्या केंद्रांपासुन १०० मीटर परिसरात सीआरपीसी कलम १४४ अन्वये आदेश लागू करण्यात आले होते. तसेच सर्व परिक्षा केंद्रावर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्याशिवाय लेखी परीक्षे दरम्यान होणारे गैरप्रकार टाळण्यासाठी प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेऱ्याची व्यवस्था देखील करण्यात आली होती. त्यामुळे हा गैरप्रकार उघडकीस आला.

# नवीन पनवेल भागातून विदेशी सिगारेटचा व गुटख्याचा साठा जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अंमली पदार्थ विरोधी पथकाने नवीन पनवेल भागातील एका पान शॉपवर तसेच एका घरावर छापा मारुन सुमारे २ लाख ३३ हजार रुपये किंमतीचा परदेशी सिगारेटचा साठा तसेच गुटख्याचा साठा जप्त केला आहे. तसेच या कारवाईत तिघांना ताब्यात घेतले आहे.

नवीन पनवेल सेक्टर–११ मधील आदई सर्कल येथील विनम्र पान शाँपमध्ये वेगवेगळ्या ब्रँडचे विदेशी कंपनीचे सिगारेटचा तसेच गुटख्याचा साठा करुन त्यांची सर्रास विक्री करण्यात येत असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी कक्षाला मिळाली होती. त्यामुळे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सय्यद यांनी सदर पान शॉपवर कारवाई करण्याचे सुचित केल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक विजय शिंगे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक चौधरी व त्यांच्या पथकाने सोमवारी दुपारी दिड वाजण्याच्या सुमारास आदई सर्कल येथील विनम्र पान शाँपवर छापा मारुन सदर पान शॉपची तपासणी केली. या कारवाईत सदर पान शॉपमध्ये वेगवेगळे विदेशी सिगारेटचे पाकिटे व आर एम डी गुटखा व सुगंधी तंबाखुचा साठा करुन ठेवण्यात आल्याचे आढळुन आले. तसेच सदर सिगारेटच्या पाकिटावर शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारचे वैधानिक चित्र व वैधानिक इशारा लिहिले नसल्याचे आढळुन आले. त्यानंतर अंमली पदार्थ विरोधी पथकाने सदर पान शॉप मधून २३,८८० किंमतीचा पानमसाला, सुगंधीत तंबाखु व विदेशी सिगारेटचा साठा जप्त केला. त्यानंतर अंमली पदार्थ विरोधी पथकाने सदर पान शॉपचा मालक आदित्य सविता याच्याकडे सदरचा माल कुठुन आणला तसेच या मालाचा साठा इतर कुठे ठेवण्यात आला आहे? याबाबत विचारपुस केली असता, सदरचा माल नवीन पनवेल सेक्टर–६ येथे रहाणारा त्याचा भाऊ प्रदयुमन कैलानाथ सविता व त्याचा मित्र सुनिलकुमार गिरध–ारीलाल विश्वकर्मा हे दोघे आणत असल्याचे व त्यांनीच सदरचा माल त्याला दिल्याचे सांगितले. त्यानुसार अंमली पदार्थ विरोधी पथकाने नवीन पनवेल सेक्टर–६ मधील रोहाऊसवर छापा मारुन सदर घराची तपासणी केली केली. या तपासणीत सदर घरातील बेडरुममध्ये वेगवेगळे परदेशी सिगारेटचे पाकीटे व गुटख्याचा साठा करुन ठेवण्यात आल्याचे आढळुन आले. तसेच सदर सिगारेटच्या पाकिटावर शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारे योग्य आकाराचे वैधानिक चित्र व वैधानिक इशारा लिहीलेला नसल्याचे देखील आढळुन आले. त्यानंतर सदर घरातून १,०१,३०० रुपये किंमतीचा पान मसाला व सुगंधित तंबाखूचा साठा तसेच १,०८,००० रुपये किंमतीचा विदेशी सिगारेटचा साठा जप्त करण्यात आला. सदरचा माल त्यांनी कुठून आणला याबाबत पोलीस पथकाने त्यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर अंमली पदार्थ विरोधी पथकाने सुनिलकुमार विश्वकर्मा, प्रदयुमन सविता व आदित्य सविता या तिघा विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुन पुढील कारवाईसाठी तिघांना ताब्यात घेतले आहे.

# परतीच्या पावसाने हळवी भातशेती धोक्यात

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

गेली आठ दिवस अधून मधून कोसळत असलेल्या परतीच्या पावसाचा सर्वात मोठा फटका भातशेतीला बसत असल्याने हळवी भातशेती धोक्यात येऊन शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.

आपला भारत देश मोसमी हवामानाचा देश असल्याने बहुतांश जनजीवन हे शेतीवरच अवलंबून आहे. शेती हेच मुख्य रोजगाराचे साधन असल्याने आपली अर्थव्यवस्थाही कृषीक्षेत्राशी निगडीत आहे. परंतू दरवर्षी मोसमी हवामानाचा फटका शेती क्षेत्राला बसत असल्याने उत्प–ादनात तर घट होतच आहे. याशिवाय शेतकरी वर्गाच्या उदरनिर्वाहासह रोजगाराचीही समस्या निर्माण होऊ लागली आहे. तर गेल्या आठ दिवसापासून दिवसभरात अधून मधून कोसळत असलेल्या पावसामुळे तसेच वाहणाऱ्या वा–यामुळे भातशेती आडवी होऊन नुकसानही झाले आहे. हळवी भातशेती तयार होऊन व भाताचे कणिसही चांगले भरल्याने व त्याचा भार भर पावसात सोसत नसल्याने काही ठिकाणी भाताची तयार कणसे जमीनदोस्त झाली असल्याचे दिसून येत आहेत. यावर्षीच्या पावसाळी हंगामात सुरूवातीपासून भातशेतीला लायक पाऊस पडल्याने भाताचे सर्वच वाण चांगलेच टवकारले व भातशेतीलाही चांगलाच बहर आला असल्याचे पहावयास मिळाले. एकंदरीत भातशेती चांगली टवकारल्याने शेतकरीवर्गही सुखावला असतानाच गेल्या आठ दिवसांपासून परतीचा पाऊस सक्रीय होऊन कोसळू लागल्याने शेती क्षेत्राचे फार मोठे नुकसान होऊ लागले आहे. हीच परिस्थिती आणखी काही दिवस राहिली तर शेतकरी वर्गासमोर फार मोठे आर्थिक संकट निर्माण होऊन उपजिविकेचाही प्रश्न सतावणार असल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होऊ लागली आहे.



# ६३ हजार रुपये किंमतीच्या वायरच्या बंडलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील करंजाडे सेक्टर आर २ येथे असलेल्या गाळ्यातून अज्ञात चोरट्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या वायरच्या बंडलांची चोरी केली असून त्याची किंमत जवळपास ६३ हजार इतकी आहे. सेक्टर आर २ करंजाडे येथे असलेल्या गाळ्याचे शटर अज्ञात चोरट्यांनी कोणत्यातरी हत्याराने उचकटून आत प्रवेश करून आतमध्ये असलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या वायरच्या बंडलांची चोरी करून तो पसार झाला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली.

# उरण तालुक्यातील शेतकरी ई-पिक पाहणी भरण्यापासून वंचित

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांकडे आजही अँड्रॉइड मोबाइल फोन नाहीत.त्यामूळे महसूल विभागाच्या आदेशानुसार ई– पिक पाहणी कशी करावी ? असा प्रश्न उरणच्या शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.तरी शासनाने शेतकऱ्यांना अनिवार्य करण्यात आलेली ई– पिक पाहणी रद्द करुन ती महसूल विभागाच्या यंत्रणेकडूनच करण्यात यावी अशी मागणी सामान्य शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

उरण तालुक्यातील अनेक गावातील, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती ही अत्यंत बिकट आहे.त्यामुळे आज ही अनेक शेतकरी अँड्रॉइड मोबाइल फोन घेऊ शकत नाहीत.काही शेतकऱ्यांकडे साधे फोन आहेत.काही अंशी शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड मोबाइल फोन आहेत.परंतू त्यात इंटरनेट बॅलन्स नाही.तसेच काही भागात नेटवर्कचा आता पता नाही.

त्यामूळे शासनाने शेतकऱ्यांसाठी लागू केलेली ई– पिक पाहणी कार्यक्रम डोकेदुखी ठरत आहे.एकंदरी एक ना अनेक कारणांमुळे माहिती विहित मुदतीत न भरल्यास ७/१२ वरील पिकाचा तक्ता निरंक राहून पिक कर्ज, पिक अनुदान, नुकसान भरपाई अशा विविध बाबीं पासून शेतकरी वंचित राहणार आहे. तरी शास–नाने या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शेतकऱ्यांना महसूल, कृषि विभागाच्या माध्यमातून सहकार्य करावे अशी मागणी शेतकरी करत आहेत.

८० टक्के शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड मोबाइल फोन नाहीत.आणि मोबाईल फोन असला तरी तो उरण ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना हाताळता येत नाही.त्यामुळे अशा शेतकऱ्यांना ई – पिक पाहणी करून सदर शेतीसंबंधी माहिती आपल्या मोबाईल वरुन भरणे अशक्य आहे. तरी शासनाने नियुक्त केलेल्या तलाठी, ग्रामसेवक तसेच इतर महसूल विभागाच्या माध्यमातून ई – पीक पहाणी करून शेतकऱ्यांना सहकार्य करावे अशी मागणी सर्वसामान्य शेतकरी वर्ग करीत आहे.

# अरसिया गोठेकर य.च.मुक्त विद्यापिठाची सुवर्ण पदक मानकरी

**दै.रायगड नगरी । किशोर पितळे**

तळा : तळा येथील मुस्लिम समाजातील कु.अरसिया अहमद गोठेकर हिने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, निजामपूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळ येथे B.Sc (M.L.T.) शिक्षण पूर्ण केले असून पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला.

या संस्थेत विविध शिक्षणक्रमात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा २ मार्च २०२१ ऑन लाईन पध्दतीने २६ वा दिक्षांत समारंभ घेण्यात आला होता. परंतु कोरोना महामारी संक्रमण काळात प्रत्यक्ष पदवी दान समारंभाला निर्बंध होते. सदर पदवीदान समारंभ निजामपूर येथे काल घेण्यात आला. यावेळी कुलगुरू, संस्था चालक, शिक्षकवर्ग यांच्या उपस्थितीत कुलगुरुच्या हस्ते सुवर्ण



पदक, पदवी प्रमाणपत्र, परितोषीक प्रमाण पत्र धनाकर्ष देऊन सन्मानित करण्यात आले. तीने विद्यापीठाचे नांव उज्वल केले असून निजामपूर वि.शि.प्र. मंडळ चे नांव मोठे केले आहे. तालुक्यातील मुस्लिम समाजातील एकमेव विद्यार्थीनीने जिध्द चिकाटी च्या बळावर हे यश संपादन केले या समाजात फार कमी महिला उच्च शिक्षण घेत आहेत.

मुंल पण उच्च शिक्षित झाले आहेत. परंतु शिक्षणाशिवाय पर्याय नाही उच्च शिक्षण असेल तर भविष्यात स्वतः चे हिम्मतीवर अश्यक्य गोष्टी शक्य करून दाखवू शकतो असे प्रतिनीधीशी बोलताना व्यक्त केले असुन समाजा पुढे एक नवा आदर्श घालून दिला आहे. तिचे सामाजिक स्तरावर कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
Email :-mahad.ee@mahapwd.com Ph.No. 02145 222167
**ई-निविदा सूचना क्रमांक ४८ सन २०२१-२०२२**
**(फेर निविदा/द्वितीय सूचना)**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दुरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील **नोंदणीकृत कंत्राटदार** यांचेकडून खालील प्रमाणे **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| ई-निविदा क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत (रुपये) | निविदा अनामत रक्कम (रुपये) | ई-निविदा संचाची किंमत (ऑनलाईन) (रुपये) | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा वगळून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | विर येथे रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (२५१५ इतर ग्राम विकास कार्यक्रम सन २०२०-२१) **(तृतीय सूचना)** | २३९३३३२/- | २४०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| २. | मोरगिरी गावठाण येथे सभागृह बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (२५१५) **(द्वितीय सूचना)** | १७०३६८४/- | १८०००/- | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक (फेर निविदा/द्वितीय सूचना)**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड करण्याचा व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक | दिनांक ०१/१०/२०२१ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक ०८/१०/२०२१ (११.००) वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनव्दारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक ११/१०/२०२१ वेळ ११.०० |

**टिप:-** परिपुर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदेचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/२७५५
दिनांक : २७/०९/२०२१

(आर. के. बामणे)
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग, महाड

**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | श्री.सुधीर यशवंत पुराणिक, फायनल प्लॉट नं. ५०–६+१२+१३/३ पनवेल | १ बदाम | पनवेल महानगरपालिका हद्दीमधील फायनल प्लॉट नं.५०–६+१२+१३/३ या मिळकतीमधील इमारतीच्या गेटच्या समोर रस्त्याच्या बाजूला मध्येच एक झाड आहे. त्यामुळे गाडी इमारतीच्या आवारात येण्यास पूर्णतः अडथळा येत आहे. तरी १ बदामाचे झाड तोडणेकामी परवानगी बाबत. |
| २ | टाटा मेमोरियल सेंटर, ॲक्ट्रक, खारघर, सेक्टर २२, नवी मुंबई | १ कांचन, १ कदंब १ गुलमोहर १ सोनमोहर १ सप्तपर्णी | पनवेल महानगरपालिका हद्दीतील टाटा मेमोरियल सेंटर, ॲक्ट्रक, खारघर, सेक्टर–२२, नवी मुंबई येथील १ कांचन, १ कदंब, १ गुलमोहर, १ सोनमोहर, १ सप्तपर्णी अशी एकूण ५ झाडे HWCC Utility Block Phase-3 प्रकल्प स्थापित करण्याकरिता अडथळा निर्माण होत असल्याने तोडण्यास परवानगी मिळावी. तरी १ कांचन, १ कदंब, १ गुलमोहर, १ सोनमोहर, १ सप्तपर्णी अशी एकूण ५ झाडे तोडणेकामी परवागनी बाबत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सुचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

पमपा/उद्यान/२१२१/प्र.क्र.६२/४१३/२०२१
दिनांक : ३०/०९/२०२१

**सही/–**
**सहा आयुक्त**
**तथा**
**वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

# करंजाडे येथून इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक इसम कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

करंजाडे वसाहतीमध्ये राहणारा रुपेश बाबासाहेब खाकाळ (३६) रंग सावळा, उंची १६.५ से.मी. अंगाने मजबूत, केस काळे व बारीक, डोळे काळे असून अंगात फिक्कट निळ्या रंगाचा फुल बाह्याचा शर्ट, काळ्या रंगाची साधी पॅन्ट घात–लेली आहे. तसेच पायात ब्राऊन रंगाची चप्पल आहे.



या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पन–वेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पो.ना.व्ही.बी. गावडे यांच्याशी संपर्क साधावा.